# पनवेल बसस्थानकातील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण सुरू;

# डॉ.भक्तीकुमार दवे यांच्या हस्ते कामाचे भुमीपूजन

पनवेल(प्रतिनिधी) पनवेल बस स्थानकातील अंतर्गत रस्त्यांच्या कॉंक्रीटरण कामाचे भुमीपूजन प्रवासी संघाचे अध्यक्ष तथा कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते डॉ.भक्तीकुमार दवे यांच्या हस्ते आज (दि.१३) पनवेल बस स्थानकात करण्यात आले. या कार्यक्रमास पनवेल आगार व्यवस्थापक आर.जी.परदेशी, विभागीय अभियंता पी.ए.जामनीक, कनिष्ठ अभियंता एम.ई.सावंत, प्रवासी संघाचे उपाध्यक्ष यशवंत ठाकरे तसेच कंत्राटदार के.टी.मते आदी मान्यवर उपस्थित होते.

पनवेल एस्.टी.बस स्थानक बीओटी तत्त्वावर बांधण्याच्या सबबी सांगत राज्य परिवहन दुरावस्था वाढवीत असल्याच्या निषेधार्थ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल प्रवासी संघाने सामुदायिक उपोषण केले होते तसेच हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सातत्याने पाठपुरावाही केला. त्यावेळी मुंबई विभागाच्या विभाग नियंत्रकांनी त्वरीत पनवेल येथे येवून प्रवासी संघाच्या पदाधिकाऱ्यांची भेट घेवून चर्चा केली होती. या चर्चेनंतर पनवेल बस स्थानकाच्या बीओटीला मंजूरी येईपर्यंत तातडीच्या व आवश्यक दुरूस्त्यांसाठी मंडळाने 'शॉर्ट टेंडर' काढून टप्प्याटप्प्याने कामे पूर्ण करावीत.अतिरिक्त खर्चासाठी तत्काळ प्रस्ताव तयार करून तेही संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठवावेत अशा सुचना आमदार प्रशांत ठाकूर यांनी केल्या होत्या, त्याचबरोबर पनवेल प्रवासी संघाने परवानग्या व संमतीसाठी शासनाकडे पाठपुरावाही केला. आमदार प्रशांत ठाकूर व पनवेल प्रवासी संघाच्या प्रयत्नांना यश आले आहे, यामुळे तात्पुरत्या अंतर्गत रस्ते कॉंक्रीटीकरणाचा निर्णय घेण्यात आला आहे.

पनवेल बस स्थानकाचे नुतनीकरण बीओटी तत्वावर लवकरच करण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी ३६ कोटी रूपये खर्च येणार असून १0 हजार स्क्वे.मीटर जागा बसस्थानकासाठी उपलब्ध होणार आहे. यामध्ये कार्यालय, अधिकारी कक्ष, स्वच्छतागृह व इतर सोयी उपलब्ध करण्यात येणार असून व्यावसायिक दुकाने, गाळे, स्टॉल हे 'बांधा, वापरा व हस्तांतरण' तत्वावर देण्यात देण्यात येणार आहेत, परंतु अनेक परवानग्या मिळूनही काही तांत्रिक अडचणीमुळे नुतनीकरणाचे काम लांबणीवर गेले आहे, तत्पूर्वी पनवेल स्थानकातून प्रवास करणाऱ्या विद्यार्थी, महिला, नोकरदार, चाकरमानी यांची हेळसांड थांबवावी, यासाठी हे काम सुरू करण्यात आले आहे.

*आमदार प्रशांत ठाकूर यांनी सतत केलेल्या पाठपुराव्यामुळे तसेच पनवेल प्रवासी संघाने उभारलेल्या उपोषणांसारख्या आंदोलनामुळे पनवेल बस स्थानकामध्ये तातुपरती डागडुजीची कामे सुरू करण्यात येत आहेत. पनवेल बस स्थानकात येत्या पावसाळयात प्रवाशांची गैरसोय होवू नये, येथील परिसरात खडडयांमध्ये पाणी साचू नये यासाठी तातुरत्या स्वरूपाचे कॉंक्रीटीकरणाचे काम महामंडळाकडून करण्यात येत आहे.* **- डॉ.भक्तीकुमार दवे, अध्यक्ष पनवेल प्रवासी संघ**

*हे काम दोन टप्प्यांमध्ये होणार असून पहिल्या टप्प्यामध्ये बाहेरील गाडया आत येणाऱ्या प्रवेशव्दारावर तर दुसऱ्या टप्प्यामध्ये स्थानकातील बसगाडया बाहेर जाणाऱ्या मुख्य रस्त्यांवर हे कॉंक्रीटीकरण करण्यात येणार आहे. यासाठी दोन्ही टप्प्यातील कॉंक्रीटीकरणासाठी एकूण २0 लाख रूपये निधीची तरतूद करण्यात आली आहे.* **- आर.जी.परदेशी, आगार व्यवस्थापक**